# शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## शैक्षणिक वर्ष २०२२–२०२३ प्रवेश फेरीच्या अनुषंगाने

### विद्यार्थ्यांकरीता सूचना :

१. अंतिम गुणवत्ता यादी दि.२०/०८/२०२२ रोजी प्रसिध्द करण्यात येणार आहे. ती प्रसिध्द झाल्यानंतर विद्यार्थ्यांनी त्यांचा पसंतीक्रम (**Preference**) **http://sukapps.unishivaji.ac.in/ pgentrance/#/login** या लिंकवर दि..२० व २१ या दोन दिवसात देणे अनिवार्य आहे. जर पसंतीक्रम सुविधा एखादया अभ्यासक्रमास उपलब्ध आहे त्या अभ्यासक्रमाचे सर्व पसंतीक्रम देणे आवश्यक आहे. ज्या अभ्यासक्रमास पसंतीक्रम (Preference) देण्याची सुविधा उपलब्ध नसेल तर तेथे पसंतीक्रम देण्याची आवश्यकता नाही. याची विद्यार्थ्यांनी नोंद घेण्यात यावी.

२. विद्यार्थ्यांनी दिलेल्या पसंतीक्रमनुसार गुणवत्ता यादी दि.२३/०८/२०२२ रोजी प्रसिध्द करण्यात येईल. त्यानुसार विद्यार्थ्यांनी कागदपत्रे पडताळणीसाठी व अभ्यासक्रमांच्या प्रवेशासाठी संबधित अधिविभागामध्ये स्वखर्चाने सकाळी १०.०० वाजता हजर राहणे आवश्यक आहे. विद्यापीठात आल्यावर विद्यार्थ्यांना अधिविभागाची माहिती नसल्यास विद्यापीठ सुरक्षा कर्मचारी यांची मदत घेण्यात यावी.

३. विद्यार्थ्यांनी अधिविभागात कागदपत्रे पडताळणी करण्यासाठी खाली नमूद करण्यात आलेली सर्व मूळ कागदपत्रे व त्यांच्या साक्षांकित प्रती घेवून येणे आवश्यक आहे.

संबधित अभ्यासक्रमासाठी भरणा केलल्या प्रवेश अर्जाची प्रत, १० वी, १२ वी, ग्रॅज्युऐशन मार्कलिस्ट, राखीव प्रवर्गाकरीता जातीचा दाखला आवश्यक , नॉन क्रिमिलेअर सर्टिफिकेट (आवश्यकतेनुसार), दिव्यांग असल्यास त्याबाबतचे (Physically Chanllenged) प्रमाणपत्र, माजी सैनिक (Ex-Service) प्रमाणपत्र, अल्पसंख्यांक असल्यास प्रमाणपत्र, इतर अनुषंगिक आवश्यक कागदपत्रे,

४. कागदपत्रांची पडताळणी झाल्यानंतर विद्यार्थ्यांना त्यांचे प्रवेश पत्र (Allotment Letter) त्याच्या लॉगिन मध्ये उपलब्ध करून देण्यात येईल. अधिविभागात होणारे प्रवेश हे संपूर्ण संगणकीय प्रणालीतून होणार असल्यामुळे संबधित अभ्यासक्रमाचे शैक्षणिक शुल्क हे फक्त ऑनलाईन मोडमध्येच (Debit Card, Credit Card, UPI Payment) स्विकारण्यात येणार आहे. त्यानुसार विद्यार्थ्यांनी पेमेंट करताना Debit Card, Credit Card, UPI Payment या सुविधांचा वापर करून पेमेंट आदा करावे.

५. प्रथम प्रवेश फेरीचा तपशिल खालील प्रमाणे राहील.

| | |
|---|---|
| जागा जाहीर करणे | दि.२२ ऑगस्ट, २०२२ |
| प्रथम प्रवेश फेरीची तारीख | दि. २४ ऑगस्ट, २०२२<br>(रसायनशास्त्र अधिविभाग व्यतिरिक्त सर्व अधिविभाग) |
| | दि. २५ व दि.२६ ऑगस्ट, २०२२<br>(फक्त रसायनशास्त्र अधिविभाग ) |

६. व्दितीय प्रवेश फेरीचा तपशिल संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येईल तसेच प्रवेश फेरीच्या अनुषंगाने झालेला बदल संकेतस्थळावर http://www.unishivaji.ac.in/mscadmission/Admission-2022-2023 प्रसिध्द करण्यात येईल. त्यासाठी विद्यार्थ्यांनी वेळोवेळी संकेतस्थळावर भेट द्यावी.

* * * * * * * * * * * * * *